नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०५/२०२५ (बुधवार)**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद , ९१ लाख २० हजरांचा मुद्‌देमाल जप्त, भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :—दिनांक २८/०५/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई कं १ :—** पोलीसांनी नागभीड ते उमरेड रोड येथे नाकाबंदी केली असता ट्रक कं.एम. एच. ४० सी.एम. ६६०२ हा येताना दिसला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक आरोपी मोहम्मद मुख्तार खान मो. सराजुद्‌दीन खान, वय ४० वर्षे ,रा. न्यु खरबी, नागपुर** हा मिळुन आल्याने त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालका बाबत विचारपुस केली असता वाहन मालक **नामे अशोक भानारकर, रा. अयोध्यानगर, नागपुर अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१)** ट्रक कं.एम.एच.४० सी.एम.६६०२ किमती ४०,००,०००/—रूपये **२)** १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण ४०,५०,०००/—रूपयेचा माल जप्त करण्यात आला आहे.

**कारवाई कं २ :—** पोलीसांनी पो.स्टे. टी पॉईट येथे नाकाबंदी केली असता ट्रक कं.एम.एच.४० बी.जी. ९२१६ आणि ट्रक कं.एम.एच.४९ बी.झेड. ७२३७ हे दोन वाहन मिळुन आले. दोन्ही वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक कं.एम.एच.४० बी.जी. ९२१६ चा वाहन **चालक प्रशांत रूषी चंडीमेश्राम, वय २५ वर्षे ,रा. जुनोना ता पवनी जि. भंडारा आणि** ट्रक कं.एम.एच.४९ बी.झेड. ७२३७ चा **चालक समशाद खान**

**इस्त्राफिल खान, रा. बालुमात जि. लातेहार, झारखंड ह.मु. रोशनबाग, बहादुरा रोड, नागपुर** हे मिळुन आल्याने त्यांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्या कडे कोणताही परवाना नव्हता. वाहन मालकबाबत विचारपुस केली असता **ट्रक क्रं.एम.एच.४० बी. जी. ९२१६ चा मालक विक्की राजु राजभोयर, रा. जुनोना ता. पवनी आणि ट्रक क्रं.एम.एच. ४९ बी.झेड. ७२३७ चा मालक नामे इस्माईल आमीरउद्दीन अन्सारी, रा. रोशनबाग, बहादुरा रोड, नागपुर अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष १) ट्रक क्रं.एम.एच. ४० बी.जी. ९२१६ किंमती २०,००,०००/रूपये व त्यातील ६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये २) ट्रक क्रं.एम.एच.४९ बी.झेड. ७२३७ किंमती ३०,००,०००/—रूपये व त्यातील ८ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये असा एकुण ५०,७०,०००/रूपयेचा माल जप्त करण्यात आला आहे.

**दोन्ही कारवाईत तीन वाहनासह २४ ब्रास रेती असा एकुण ९१,२०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद चालक आणि मालक आरोपीतांविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून चालक आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद , २ आरोपी अटक, आरोली पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली**:—दिनांक २७/०५/२०२५ रोजी अरोली पोलीस हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा नांदगाव येथे नाकाबंदी केली असता कोदामेंढी कडुन नांदगाव कडे १० चक्का टिप्पर क्रं.एम.एच.४० .एन. ७७०२ हा येताना दिसला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक आरोपी विजयकुमार जैतराम मंडावि, वय २९ वर्षे ,रा.कादर झेंडा,**

**बंगाली कॉलनीच्या मागे, कामठी** हा मिळुन आल्याने त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालक **नामे मनिष आनंद बोरकर, वय ३५ वर्षे, रा. सुगत नगर,जरीपटका नागपूर हा असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) टिप्पर क्रं.एम.एच.४० .एन. ७७०२ किमती २०,००,०००/—रूपये व २) ४ ब्रास रेती किंमती २४,०००/— रूपये आणि ३) वाहन चालक आणि मालक यांचे ताब्यातील २ ॲड्रॉईड मोबाईल किंमती २०,०००/— रूपये असा एकुण २०,४४,०००/रूपयेचा माल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद चालक आणि मालक आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही चालक आणि मालक आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १६ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये १६ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत **दिनांक २७/०५/२०२५** रोजी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— खापरखेडा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे क्रमांक १. हेमराज चिंतामणजी लव्हारे, वय ५० वर्षे, रा. वार्ड क्र ०२, शाम मंगल कार्यालय, खापरखेडा ता. सावनेर, जि. नागपुर,हा मौजा चिचोली येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आरोपी क्रं २ नामे बबन हेमराज कटरे, वय २८ वर्ष, रा वार्ड क्र ०२. शाम मंगल कार्यालय, खापरखेड़ा ता सावनेर, जि. नागपुर हा हनुमान मंदीर चिचोली येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन देवलापार :—** देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे रंजीत जयसीग मडके, वय ३५ वर्ष, रा हिवराबाजार, ता. रामटेक, जि.नागपुर ,हा मौजा हिवराबाजार हनुमान मंदिर जवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन बेला** :— बेला पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे रूतुकेश शरद हिंगनीकर, वय २४ वर्षे, रा बेला ता उमरेड जि. नागपुर हा बेला टाउन येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन बोरी** :— बोरी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी रहेमान इस्माईल पठाण, वय ५२ वर्षे, रा. बोरी हा मौजा बोरी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** एमआयडीसी बोरी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी अंकुश पुनबा बोटरे, वय ५० वर्षे ,रा. सुराबर्डी ता.उमरेड जि. नागपुर हा मौजा टेंभरी मोरारजी कंपनी कडे जाणारा रोड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन उमरेड :—** उमरेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रमांक १. नामे शुभम वंसतराव किरपाने, वय ३० वर्ष ,रा. उमरेड हा मौजा आठवडी बाजार उमरेड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला, आरोपी क्रं २ नामे वेंदात दिलीप वाघमारे, वय १९ वर्षे,रा. पिराया, ता. उमरेड हा तहसील कर्यालयाच्या मागे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन कुही :—** कुही पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी अमित अशोक मेश्राम वय ३५ वर्श रा. कुही हा मौजा कुही येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** कळमेश्वर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रमांक १. नामे नविन रामाजी पानसे, वय २७ वर्ष, रा. खापरी पोस्ट घोराड , आरोपी क्रं २ नामे विश्राम दिनेश्वर पहाल, वय १८ वर्षे ,रा. रांची झारखंड आरोपी क्र.३ हरीलाल कारू महातो, वय ४५ वर्ष ,रा. रामगड, झारखंड ह.मू. सच्ची सतनाम धाम, येरला ,ता.जि. नागपूर हे तिघेही मौजा बस स्टॉप कळमेश्वर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**पोलीस स्टेशन सावनेर :—** सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी लक्ष्मण सेवके, वय ५५ वर्षे, रा. वार्ड नं. १४ माताखेडी, पोळा मैदान ,ता. सावनेर जि. नागपूर हा मौजा माताखेडी पोळा मैदानजवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन काटोल:—** काटोल पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रमांक १. नामे मुकेश झिगरूजी मंधरे, वय ३५ वर्ष ,रा. संगमा नगर काटोल , आरोपी क्रं २ नामे शुभम किशोर पोहनकर, वय ३१ वर्षे, रा. आयु.डी. पी. काटोल ,ता.काटोल आणि आरोपी क्र.३ विजय रूपचंद निषाद, वय ३० वर्षे, रा. रेवतकर ले आउट ,खुटाबा रोड, काटोल हे तिघेही संगमा नगर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या वर नमुद एकुण १६ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये १६ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने